न्यायालयीन निर्णयानुसार धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम, व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३ पंचायत समित्यांमधील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम .....

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २२ जून, २०२१

प्रति,
जिल्हाधिकारी
धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर

**विषय: न्यायालयीन निर्णयानुसार धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या ३३ पंचायत समित्यांमधील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणुकांचा निवडणूक कार्यक्रम...**

संदर्भ: १) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९८०/२०१९ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०४ मार्च,२०२१ रोजी दिलेला निर्णय.
२) आयोगाची समक्रमाकांची दि. १७ मार्च, २०२१ रोजीची पत्रे.
३) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३३८/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि. २२ मार्च,२०२१ रोजी दिलेला निर्णय,
४) मा. सर्वोच्च न्यायालयाने संकिर्ण अर्ज क्र. ६५९/२०२१ व इतर संलग्न इंटरवेंशन अर्जांमध्ये दि. ३० एप्रिल, २०२१ रोजी दिलेला निर्णय.
५) मा. सर्वोच्च न्यायालयाने पुनर्विलोकन याचिका क्र. ६७६२ (डायरी)/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि. ४ मे,२०२१ रोजी दिलेला निर्णय.

महोदय,

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या दिवाणी रिट याचिका क्र. ९८०/२०१९ तसेच इतर संलग्न रिट याचिकांमध्ये दि. ४ मार्च, २०२१ रोजीच्या आदेशामध्ये एकूण आरक्षण ५० टक्के पेक्षा अधिक होत असलेल्या मुद्यांवर निर्णय देताना मा. सर्वोच्च

न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांचे संदर्भात नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाची तरतूद अवैध न ठरवता त्यात अंशतः बदल केला. मात्र या बदलाप्रमाणे सदर आरक्षण हे दि. ११ मे, २०१० रोजी रिट पिटीशन (सिव्हील) क्र. ३५६/१९९४, श्री. डॉ. के कृष्णमूर्ती विरुध्द केंद्र शासन मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने घालून दिलेल्या त्रिसूत्रीचे पालन केल्यानंतरच लागू करता येईल असे देखील स्पष्ट केले. उपरोक्त जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सन २०२० च्या सार्वत्रिक निवडणूकीत मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर निवडणूका विशेषत: नागरीकांच्या मागावसवर्ग प्रवर्गाच्या जागांच्या बाबतीत त्या न्यायालयीन निर्णयाचे अधीन राहून घेण्यात येतील असे दि. २८ ऑगस्ट, २०१९, दि. ७ नोव्हेंबर, २०१९ व दि. १८ डिसेंबर,२०१९ रोजीच्या अंतरीम आदेशात नमूद केले होते. त्यानुसार दि. ४ मार्च, २०२१ रोजीच्या निर्णयानुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांवर झालेल्या निवडणूका तात्काळ प्रभावाने रद्दबादल ठरवून रिक्त झालेल्या सर्व जागा सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्याबाबत दोन आठवड्याच्या आत निवडणूक प्रक्रिया आरंभ करण्याचे आयोगाला आदेश दिले.

२. न्यायालयाच्या आदेशातील परिच्छेद २६ व २८ नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील सदस्यांच्या जागा रिक्त झाल्याचे मानण्यात येईल असे आदेश असल्याने नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातून निवडून आलेल्या सर्व सदस्यांना न्यायालयाचे आदेश लेखी बजावण्याबाबत, आयोगाने दि. ०५ मार्च २०२१ व दि. १६ मार्च २०२१ रोजीच्या पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळविले. त्यानुसार धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर या ६ जिल्हा परिषदांमधील ८५ निवडणूक विभाग व ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील सदस्य पदे रिक्त झाली.

आयोगाने दि.१७ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये या रिक्त झालेल्या पदांमधून सर्वसाधारण महिलांसाठी जागा आरक्षित करण्याकरिता आरक्षण सोडत कार्यक्रम दिला. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी

सर्वसाधारण महिला आरक्षण प्रक्रिया अधिनियम कलम १२(२)(ड) व ५८(१)(ड) च्या तरतुदीनुसार पार पाडली आहे.

३. तसेच आयोगाचे दि.१७ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ६ जिल्हयातील ८५ निवडणूक विभाग व ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांमधील मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला होता. अधिनियमाच्या कलम १३(१) नुसार भारत निवडणूक आयोगाने अंतिमत: प्रसिध्द केलेली दि. १५ जानेवारी, २०२१ रोजीची विधानसभा मतदार यादी घेवून आयोगाने मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम पार पाडला आहे. या कार्यक्रमानुसार पोट निवडणूकांसाठी वापरण्याकरिता दि.२७/०४/२०२१ रोजी मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

दरम्यान दि. २२ मार्च २०२१ रोजीच्या सुनावणीमध्ये आयोगाने महिला आरक्षण प्रक्रिया व मतदार यादी प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. २२ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये निवडणूक प्रक्रिया पुढे चालू ठेवण्याचे आदेश दिले.

४. राज्य शासनाने दिनांक १९ मार्च २०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील कोविड - १९ ची गंभीर परिस्थिती आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. उक्त कोविड - १९ च्या वास्तविकतेचा विचार करता सुरू केलेली निवडणूक प्रक्रिया तत्कालीन परिस्थितीत दोन महिन्यांकरिता स्थगित ठेवली जाणे योग्य राहील असे विचारांती आयोगाचे मत झाले जे न्यायालयात मांडण्यात आले. निवडणुकीसंदर्भात दाखल संकिर्ण अर्ज क्र. ६५९/२०२१ व इतर संलग्न इंटरवेंशन अर्जांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ३० एप्रिल, २०२१ रोजीच्या दिलेल्या निर्णयामध्ये राज्यातील कोविड-१९ ची वस्तुस्थिती पाहता, आयोगाने परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून निवडणुका घेण्याबाबत समयोचित आवश्यक तो निर्णय घ्यावा असे आदेशीत केले आहे.

५. रिट याचिका क्र. ९८०/२०१९ च्या दि. ४ मार्च, २०२१ रोजीच्या आदेशाबाबत शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका क्र. ६७६२ (डायरी) /२०२१ दाखल केली होती. त्याचप्रमाणे काही नागरिकांनी देखील आणखी दहा पुनर्विलोकन याचिका दाखल केल्या होत्या. मा.सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीअंती दिनांक ४ मे २०२१ रोजी या सर्व अकरा पुनर्विलोकन याचिका व त्यासोबतचे सर्व स्थगिती मागणारे अर्ज फेटाळले.

६. आता, राज्य शासनाच्या महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभागाने दि. ४ जून, २०२१ रोजीच्या आदेशान्वये (Level of Restriction for Breaking the Chain) कोवीड-१९ चे लागू करण्यात आलेले निर्बंध शिथिल करण्यासाठी जिल्हे व शहरातील ऑक्सीजन बेडच्या रुग्णांची संख्या व कोरोना पॉझीटीव्हीटीचा दर यानुसार निर्बंधाचे १ ते ५ स्तर निश्चित केले आहेत. राज्य शासनाच्या दि.०४ जून, २०२१ च्या आदेशातील परिच्छेद १० (III) येथील तक्तातील अ.क्र. १४ समोर नमूद केल्याप्रमाणे- बैठका/ स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्थांच्या निवडणूका हया स्तर-१ मध्ये नियमित व स्तर २ ते ४ मध्ये ५० टक्के क्षमतेने राबविण्याची मुभा दिली आहे.

७. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भाधीन क्र. ४ च्या निर्णयानुसार ६ जिल्हा परिषदा व ३७ पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या निवडणूका घेण्यास राज्य निवडणूक आयोग बांधील असल्याने, राज्य शासनाचे उपरोक्त दि.०४ जून, २०२१ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल मागविण्यात आले. या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडील प्राप्त अहवालानुसार धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर हे ५ जिल्हे स्तर-१ मध्ये तर पालघर हा जिल्हा स्तर - ३ मध्ये येतो.

८. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर हे पाच जिल्हे स्तर-१ (कोवीड १९ च्या अनुषंगाने) मध्ये येत असल्याने, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांचा निवडणूक कार्यक्रम राबविता येईल असे आयोगाचे मत झाले आहे. उर्वरित पालघर जिल्हयाच्या

बाबतीत तेथील कोविड-१९ ची परिस्थिती अद्याप निवळली नसल्याने भविष्यात हा जिल्हा स्तर - १ मध्ये आल्यानंतर तेथील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम राबविण्याबाबत आयोग निर्णय घेईल.

९. आता या पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट - २ मधील पाच जिल्हा परिषदा मधील ७० निवडणूक विभाग व परिशिष्ट - ३ मधील ३३ पंचायत समित्यांमधील १३० निर्वाचक गणातील रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी परिशिष्ट - १ मध्ये दिलेला निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

१०. सदर निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. या निवडणुकीकरिता आचारसंहिता जरी संबंधित मतदार संघात लागू झालेली असली तरी पोटनिवडणूक असलेल्या निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गणातील मतदारांवर प्रभाव पडेल, अशा तऱ्हेचे कोणतेही धोरणात्मक निर्णय, कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, मा. मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

११. प्रस्तुत निवडणूकांच्या दरम्यान जिल्हयामधील निवडणूक विभाग/निर्वाचक गणातील कोविड-१९ रुग्णाचा पॉझिटीव्हीटी दर व ऑक्सीजन बेड संख्या वाढल्यास, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी त्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राज्य निवडणूक आयोगास तात्काळ अहवाल पाठवतील.

१२. माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्यावेळी निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि.०२ जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. (प्रत संलग्न) या सूचनांनुसार उपरोक्त निवडणुकांबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

१३. सदर निवडणूक कार्यक्रम राबविताना कोविड-१९ या साथी रोगाच्या अनुषंगाने घ्यावयाची खबरदारी म्हणून पुढील नमूद प्रतिबंधात्मक उपाययोजना अवलंबवावी, जसे-

१. संबंधित निवडणूक क्षेत्रात शक्य असल्यास प्रभावीरित्या लसीकरण मोहीम राबवावी.

२. मतदान व मतमोजणी करिता अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करताना त्यांचा किमान पहिला लसीकरणाचा डोस झालेला असावा याची खात्री करण्यात यावी.

३. मतदानाच्यावेळी मतदान कर्मचारी तसेच मतदारांनी कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाने कोविड-१९ या साथीच्या रोगाचा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विविध उपाययोजना व दक्षता घेण्याबाबत वेळोवळी सूचना जाहीर केल्या आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पार पाडताना कोविड-१९ च्या अनुषंगाने घ्यावयाच्या खबरदारीबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का.८, दिनांक १५ डिसेंबर,२०२० तसेच दि. १३ जानेवारी, २०२१ च्या पत्रान्वये स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. तरी सदर पोटनिवडणूका पार पाडताना उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र-परिशिष्ट-१, २ व ३

प्रत :-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
४) अपर मुख्य सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ,मुंबई-१
५) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) विभागीय आयुक्त, नाशिक, अमरावती व नागपूर

८) जिल्हा पोलिस अधिक्षक, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर
९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४
१०) सहाय्यक आयुक्त (संगणकीकरण कक्ष), राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१४) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-
रानिआ/जिपपंस/२०२१/प्र.क्र.०५/का.७,
दिनांक २२/०६/२०२१ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

## न्यायालयीन निर्णयानुसार धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३ पंचायत समित्यांमधील रिक्त झालेल्या पदांच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम

| क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | कार्यक्रमांचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या तारखांची सूचना व निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करण्याची तारीख | मंगळवार, २९ जून,२०२१ |
| २ | संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशनपत्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्विकारण्याचा कालावधी | मंगळवार, २९ जून,२०२१ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) ते सोमवार, ०५ जुलै,२०२१ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) (रविवार दि.०४/०७/२०२१ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्राची छाननी व त्यावर निर्णय देणे | मंगळवार, ०६ जुलै, २०२१ (सकाळी ११ वाजल्यापासून) |
| ४ | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार, ०६ जुलै, २०२१ ( छाननीनंतर लगेचच ) |
| ५ | नामनिर्देशनपत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख | शुक्रवार, ०९ जुलै,२०२१ |
| ६ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख | सोमवार, १२ जुलै, २०२१ |
| ७ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, १२ जुलै, २०२१ |
| ८ | उमेदवारी मागे घेणे (अ) जेथे अपील नाही तेथे | सोमवार, १२ जुलै, २०२१ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| | (ब) जेथे अपील आहे तेथे | बुधवार, १४ जुलै, २०२१ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |

| | | |
|---|---|---|
| ९ | निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप-<br>(अ जेथे अपील नाही तेथे | सोमवार, १२ जुलै, २०२१<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| | (ब) जेथे अपिल आहे तेथे | बुधवार, १४ जुलै, २०२१<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| १० | मतदानाची तारीख | सोमवार १९ जुलै, २०२१<br>(सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत) |
| ११ | मतमोजणी तारीख | मंगळवार २० जुलै, २०२१<br>(सकाळी १०.०० पासून) |
| १२ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे | शुक्रवार, २३ जुलै, २०२१ पर्यंत |

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक २२/६/२०२१ सोबतचे

## परिशिष्ट-२

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | धुळे | शिंदखेडा | १८-बेटावद |
| २ | धुळे | शिंदखेडा | १९-नरडाणा |
| ३ | धुळे | शिंदखेडा | २१-मालपूर |
| ४ | धुळे | शिंदखेडा | २४-खलाणे |
| ५ | धुळे | धुळे | ४२-लामकानी |
| ६ | धुळे | धुळे | ४४-कापडणे |
| ७ | धुळे | धुळे | ४५-फागणे |
| ८ | धुळे | धुळे | ४६-नगाव बु. |
| ९ | धुळे | धुळे | ४८-कुसुंबा |
| १० | धुळे | धुळे | ४९-नेर |
| ११ | धुळे | धुळे | ५२-बोरविहिर |
| १२ | धुळे | धुळे | ५३-मुकटी |
| १३ | धुळे | धुळे | ५४-शिरूड |
| १४ | धुळे | धुळे | ५५-रतनपुरा |
| १५ | धुळे | धुळे | ५६-बोरकुंड |

## परिशिष्ट-३

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | धुळे | शिरपूर | १५-अथे खु |
| २ | धुळे | शिरपूर | १६-विखरण बु |
| ३ | धुळे | शिरपूर | १८-तऱ्हाटी त.त. |
| ४ | धुळे | शिरपूर | १९-वनावल |
| ५ | धुळे | शिरपूर | २०-जातोडा |
| ६ | धुळे | शिरपूर | २१-शिंगावे |
| ७ | धुळे | शिरपूर | २२ -करवंद |
| ८ | धुळे | शिरपूर | २५-अजनाड |
| ९ | धुळे | शिंदखेडा | २९-दाऊळ |
| १० | धुळे | शिंदखेडा | ३४-वर्षी |
| ११ | धुळे | शिंदखेडा | ३९-हातनूर |
| १२ | धुळे | शिंदखेडा | ४३ -खर्दे बु |
| १३ | धुळे | शिंदखेडा | ४४-मेथी |
| १४ | धुळे | साक्री | ५१-दुसाणे |
| १५ | धुळे | साक्री | ५३-बळसाणे |
| १६ | धुळे | साक्री | ५४-घाणेगांव |
| १७ | धुळे | साक्री | ५५ -जैताणे |
| १८ | धुळे | साक्री | ७१-पिंपळनेर |
| १९ | धुळे | साक्री | ७२-चिकसे |
| २० | धुळे | साक्री | ७६-धाडणे |
| २१ | धुळे | साक्री | ७७-कासारे |
| २२ | धुळे | साक्री | ८१-म्हसदी प्र.नेर |
| २३ | धुळे | धुळे | ८३-लामकानी |
| २४ | धुळे | धुळे | ८८-न्याहळोद |
| २५ | धुळे | धुळे | ९० -फागणे |
| २६ | धुळे | धुळे | ९७ -नेर |
| २७ | धुळे | धुळे | १०१-सडगाव |
| २८ | धुळे | धुळे | १०४-बोरविहिर |
| २९ | धुळे | धुळे | १०५-मूकटी |
| ३० | धुळे | धुळे | १०७-शिरूड |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक २२/६/२०२१ सोबतचे

## परिशिष्ट-२

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | अक्कलकुवा | ८-खापर |
| २ | नंदुरबार | अक्कलकुवा | ९- अक्कलकुवा |
| ३ | नंदुरबार | शहादा | २४-म्हसावद |
| ४ | नंदुरबार | शहादा | २९-लोणखेडा |
| ५ | नंदुरबार | शहादा | ३१-पाडळदे बु. |
| ६ | नंदुरबार | शहादा | ३५-कहाटुळ |
| ७ | नंदुरबार | नंदुरबार | ३८-कोळदे |
| ८ | नंदुरबार | नंदुरबार | ३९-खोंडामेळी |
| ९ | नंदुरबार | नंदुरबार | ४०-कोपर्ली |
| १० | नंदुरबार | नंदुरबार | ४१-रनाळा |
| ११ | नंदुरबार | नंदुरबार | ४२-मांडळ |

## परिशिष्ट-३

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्र.व नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | अक्कलकुवा | १६-कोराई |
| २ | नंदुरबार | शहादा | ४९-सुलतानपूर |
| ३ | नंदुरबार | शहादा | ५१-खेडदिगर |
| ४ | नंदुरबार | शहादा | ५३-मंदाणे |
| ५ | नंदुरबार | शहादा | ५८-डोंगरगांव |
| ६ | नंदुरबार | शहादा | ५९-मोहिदे तह |
| ७ | नंदुरबार | शहादा | ६१-जावेद तबो |
| ८ | नंदुरबार | शहादा | ६२-पाडळदे बु. |
| ९ | नंदुरबार | शहादा | ६६-शेल्टी |
| १० | नंदुरबार | नंदुरबार | ७३-गुजरभवाली |
| ११ | नंदुरबार | नंदुरबार | ७४-पातोंडा |
| १२ | नंदुरबार | नंदुरबार | ७६-होळ तर्फे हवेली |
| १३ | नंदुरबार | नंदुरबार | ८५-नांदर्खे |
| १४ | नंदुरबार | नंदुरबार | ८७-गुजरजांभोली |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक /०६/२०२१ सोबतचे

## परिशिष्ट-२

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निवडणुक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | अकोला | तेल्हारा | ०१-दानापुर |
| २ | अकोला | तेल्हारा | ०३-अडगांव बु. |
| ३ | अकोला | तेल्हारा | ४- तळेगांव बु |
| ४ | अकोला | अकोट | १०-अकोलखेडा |
| ५ | अकोला | अकोट | १५-कुटासा |
| ६ | अकोला | मुर्तिजापूर | १७-लाखपुरी |
| ७ | अकोला | मुर्तिजापूर | १८-बपोरी |
| ८ | अकोला | अकोला | २६-घुसर |
| ९ | अकोला | अकोला | २९-कुरणखेड |
| १० | अकोला | अकोला | ३०-कानशिवणी |
| ११ | अकोला | बाळापुर | ३४-अंदुरा |
| १२ | अकोला | बाळापुर | ३९-देगांव |
| १३ | अकोला | बार्शिटाकळी | ४२-दगडपारवा |
| १४ | अकोला | पातुर | ४८-शिर्ला |

## परिशिष्ट-३

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणचा क्रमांक.व नाव |
|---|---|---|---|
| १ | अकोला | तेल्हारा | ०३-हिवरखेड |
| २ | अकोला | तेल्हारा | ०६-अडगाव बु. |
| ३ | अकोला | तेल्हारा | १३-वाडी अदमपूर |
| ४ | अकोला | तेल्हारा | १५-भांबेरी |
| ५ | अकोला | अकोट | १८-प्रिंप्री खु. |
| ६ | अकोला | अकोट | १९-अकोलखेड |
| ७ | अकोला | अकोट | २५-मुंडगांव |
| ८ | अकोला | अकोट | २८-रौंदळा |
| ९ | अकोला | मुर्तिजापूर | ३४-लाखपुरी |
| १० | अकोला | मुर्तिजापूर | ३५-ब्रम्ही खु. |
| ११ | अकोला | मुर्तिजापूर | ३९-माना |
| १२ | अकोला | मुर्तिजापूर | ४६-कानडी |
| १३ | अकोला | अकोला | ४९-दहिहंडा |
| १४ | अकोला | अकोला | ५२-घुसर |
| १५ | अकोला | अकोला | ५७-पळसो |
| १६ | अकोला | अकोला | ५८-कुरणखेड |
| १७ | अकोला | अकोला | ६६-चिखलगांव |
| १८ | अकोला | बाळापूर | ७२-निमकर्दा |
| १९ | अकोला | बाळापुर | ७५-पारस भाग१ |
| २० | अकोला | बाळापुर | ७८-देगांव |
| २१ | अकोला | बाळापुर | ८०-वाडेगाव भाग-२ |
| २२ | अकोला | बार्शिटाकळी | ८३-दगडपारवा |
| २३ | अकोला | बार्शिटाकळी | ८६-मोऱ्हळ |
| २४ | अकोला | बार्शिटाकळी | ८९-महान |
| २५ | अकोला | बार्शिटाकळी | ९१-पुनोती-बु |
| २६ | अकोला | पातुर | ९६-शिर्ला |
| २७ | अकोला | पातुर | ९७-खानापुर |
| २८ | अकोला | पातुर | १०५-आलेगांव |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक २२/०६/२०२१ सोबतचे

## परिशिष्ट-२

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | वाशिम | कारंजा | २-भामदेवी |
| २ | वाशिम | मानोरा | १०-कुपटा |
| ३ | वाशिम | मानोरा | ११-तळप |
| ४ | वाशिम | मानोरा | १५-फुलउमरी |
| ५ | वाशिम | मंगरुळपीर | १९-दाभा |
| ६ | वाशिम | मंगरुळपीर | २२-कंझरा |
| ७ | वाशिम | मंगरुळपीर | २४-आसेगाव |
| ८ | वाशिम | मालेगाव | २८-पांगरी नवघरे |
| ९ | वाशिम | रिसोड | ३७-कवठा खु. |
| १० | वाशिम | रिसोड | ३९-गोभणी |
| ११ | वाशिम | रिसोड | ४१-भरजहागीर |
| १२ | वाशिम | वाशिम | ४३-काटा |
| १३ | वाशिम | वाशिम | ४४-पार्डी-टकमोर |
| १४ | वाशिम | वाशिम | ५०-उकळीपेन |

## परिशिष्ट-३

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | वाशिम | कारंजा | ०४-मोहगव्हाण |
| २ | वाशिम | कारंजा | ०७-उंबर्डा बाजार |
| ३ | वाशिम | कारंजा | १३-पोहा |
| ४ | वाशिम | कारंजा | १५-धामणी खडी |
| ५ | वाशिम | मानोरा | २०-धामणी |
| ६ | वाशिम | मानोरा | २४-कोंडोली |
| ७ | वाशिम | मानोरा | २६-गिरोली |
| ८ | वाशिम | मानोरा | २७-शेंदुरजना |
| ९ | वाशिम | मंगरुळपीर | ४०-पेडगाव |
| १० | वाशिम | मंगरुळपीर | ४२-वानोजा |
| ११ | वाशिम | मंगरुळपीर | ४५-कासोळा |
| १२ | वाशिम | मंगरुळपीर | ४८-सनगांव |
| १३ | वाशिम | मालेगांव | ४९-मारसुळ |
| १४ | वाशिम | मालेगांव | ५३-जऊळका |
| १५ | वाशिम | मालेगांव | ५४-जोडगव्हाण |
| १६ | वाशिम | मालेगांव | ६४-शिरपूर-२ |
| १७ | वाशिम | मालेगांव | ६६-खंडाळा शिंदे |
| १८ | वाशिम | रिसोड | ७३-कवठा खु. |
| १९ | वाशिम | रिसोड | ७५-हराळ |
| २० | वाशिम | रिसोड | ७९-वाकद |
| २१ | वाशिम | रिसोड | ८०-महागाव |
| २२ | वाशिम | वाशिम | ८२-मोप |
| २३ | वाशिम | वाशिम | ९०-फाळेगांव थेट |
| २४ | वाशिम | वाशिम | ९२-कळंबा महाली |
| २५ | वाशिम | वाशिम | १००-उकळीपेन |
| २६ | वाशिम | वाशिम | १०१-अनसिंग |
| २७ | वाशिम | वाशिम | १०२-पिंपळगांव |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक २२/६/२०२१ सोबतचे

## परिशिष्ट-२

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | नरखेड | २-सावरगांव |
| २ | नागपूर | नरखेड | ४-भिष्णूर |
| ३ | नागपूर | काटोल | ५-येनवा |
| ४ | नागपूर | काटोल | ६-पारडसिंगा |
| ५ | नागपूर | सावनेर | १३-वाकोडी |
| ६ | नागपूर | सावनेर | १४-केळवद |
| ७ | नागपूर | पारशिवनी | १९-करभांड |
| ८ | नागपूर | रामटेक | २३-बोथिया ( पालोरा) |
| ९ | नागपूर | मौदा | २७-अरोली |
| १० | नागपूर | कामठी | ३४-गुमथळा |
| ११ | नागपूर | कामठी | ३५-वडोदा |
| १२ | नागपूर | नागपूर (ग्रामीण) | ३६-गोधनी ( रेल्वे) |
| १३ | नागपूर | हिंगणा | ४३-निलडोह |
| १४ | नागपूर | हिंगणा | ४४-डिगडोह |
| १५ | नागपूर | हिंगणा | ४५-डिगडोह इसासनी |
| १६ | नागपूर | कुही | ५३-राजोला |

## परिशिष्ट-३

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | नरखेड | ०१-बेलोना |
| २ | नागपूर | नरखेड | ०३-सावरगाव |
| ३ | नागपूर | काटोल | १२-लाडगाव |
| ४ | नागपूर | काटोल | १३-मेटपांजरा |
| ५ | नागपूर | कळमेश्वर | १७-तेलकामठी |
| ६ | नागपूर | कळमेश्वर | १८-कोहळी |
| ७ | नागपूर | सावनेर | २३-बडेगांव |
| ८ | नागपूर | सावनेर | २६-वाघोडा |
| ९ | नागपूर | सावनेर | २८-नांदागोमुख |
| १० | नागपूर | पारशिवनी | ३५-चारगाव |
| ११ | नागपूर | पारशिवनी | ३८-नयाकुंड |
| १२ | नागपूर | रामटेक | ४६-उमरी |
| १३ | नागपूर | रामटेक | ४९-मनसर |
| १४ | नागपूर | रामटेक | ५१-नगरधन |
| १५ | नागपूर | मौदा | ५५-खात |
| १६ | नागपूर | मौदा | ५६-रेवराल |
| १७ | नागपूर | मौदा | ६२-चिरव्हा |
| १८ | नागपूर | कामठी | ६८-महालगाव |
| १९ | नागपूर | कामठी | ७०-बिडगाव |
| २० | नागपूर | नागपूर(ग्रामीण) | ७१-भोकारा |
| २१ | नागपूर | नागपूर(ग्रामीण) | ७४-दवलामेटी |
| २२ | नागपूर | नागपूर(ग्रामीण) | ८०-डोंगरगाव |
| २३ | नागपूर | हिंगणा | ८५-निलडोह वडधामना |
| २४ | नागपूर | हिंगणा | ८७-डिगडोह-१ |
| २५ | नागपूर | हिंगणा | ८९-डिगडोह इसासनी |
| २६ | नागपूर | हिंगणा | ९३-नेरी मानकर |
| २७ | नागपूर | उमरेड | ९८-मकरधोकडा |
| २८ | नागपूर | उमरेड | १०१-देवळी |
| २९ | नागपूर | कुही | १०९-सिल्ली |
| ३० | नागपूर | कुही | ११२-तारणा |
| ३१ | नागपूर | भिवापूर | ११६-नांद |